राज्यातील न्यायिक अधिकाऱ्यांसाठी १२३२ Laptops खरेदी करण्याच्या सुधारीत प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग,
शासन निर्णय क्र. संगणक-२०१७/प्र.क्र.८२/का. ०७
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०२ मार्च, २०१९.

वाचा :-
१) माहिती तंत्रज्ञान विभाग, शासन निर्णय,क्र.मातंस/नस्ती ०७/ प्र.क्र. ८९/३९, दिनांक ०१.०८.२०११.
२) केंद्रीय प्रकल्प समन्वयक, ई-कोर्ट प्रकल्प, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई यांचे पत्र क्र.Spl./Comp./७३८/२०१७, दिनांक २७.१०.२०१७.
३) दिनांक २९.०९.२०१८ रोजीच्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.
४) शासन निर्णय, विधि व न्याय विभाग, समक्रमांक, दिनांक २५.१०.२०१८.
५) शासन ज्ञापन, विधि व न्याय विभाग, समक्रमांक, दिनांक २६.११.२०१८.
६) केंद्रीय प्रकल्प समन्वयक, ई-कोर्ट प्रकल्प, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई यांचे दिनांक १९.११.२०१८ व २८.१२.२०१८ रोजीचे पत्र.
७) शासन शुध्दीपत्रक, विधि व न्याय विभाग, समक्रमांक, दिनांक २८.०१.२०१९.
८) केंद्रीय प्रकल्प समन्वयक, ई-कोर्ट प्रकल्प, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई यांचे पत्र क्र.Spl./Comp./७७/२०१९, दिनांक ३१.०१.२०१९.
९) दिनांक २१.०२.२०१९ रोजीच्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.

प्रस्तावना :-

मा.उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई यांना ई-कोर्ट प्रकल्पांतर्गत सन २०१३ मध्ये न्यायिक अधिकाऱ्यांसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या लॅपटॉप्सची कालमर्यादा ५ वर्षांपेक्षा अधिक झाल्याने, मा. उच्च न्यायालयाकडून संदर्भ क्र.२ अन्वये नवीन १८५५ लॅपटॉप्स खरेदीबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला होता. दिनांक २९.०९.२०१८ रोजीच्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीत सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आली. त्यानुसार संदर्भ क्र. ४ अन्वये दिनांक २५.१०.२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. मा. उच्च न्यायालयाच्या संदर्भ क्र. ६ नुसार दिनांक २८.१२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये करण्यात आलेल्या विनंतीनुसार याबाबतचे संदर्भ क्र.७ येथील शासन शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात आले होते. तथापि, याबाबत मा. उच्च न्यायालय यांचेकडून संदर्भ क्र. ८ नुसार १२३२ इतके Convertible Laptops (२ in १) खरेदीचा सुधारीत प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला. सदर प्रस्तावास दिनांक २१.०२.२०१९ रोजीच्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. उच्चाधिकार समितीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार दिनांक २५.१०.२०१८ रोजीचा शासन निर्णय सुधारीत करण्यात येऊन, मा. उच्च न्यायालयाच्या १२३२ इतके Convertible Laptops (२ in १) खरेदी प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

दिनांक २१.०२.२०१९ रोजीच्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार राज्यातील न्यायिक अधिकाऱ्यांसाठी १८५५ लॅपटॉप्सऐवजी १२३२ इतके Convertible Laptops (२ in १) खरेदी करण्याकरिता रु. ११,१३,००,०००/- इतक्या रकमेच्या प्रस्तावास या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर आदेश दिनांक २१.०२.२०१९ रोजीच्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीच्या कार्यवृत्तान्वये तसेच वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. विअप्र २०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग-१ उप विभाग-२ मधील अ. क्र. २७ (अ) नियम क्र. ७६ मधील २ व ३ या अटींच्या अनुषंगाने प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक०८.१२.२०१७ च्या शासन निर्णयान्वये माहिती तंत्रज्ञान विषयक सेवा व वस्तूखरेदी बाबत GeM पोर्टलची कार्यपध्दती स्वीकृत करण्यात आली असल्याने त्याप्रमाणे शासनाच्या विहित पध्दतीने खरेदी करण्यात यावी. तथापि, खरेदी करावयाचे लॅपटॉप्स GeM वर उपलब्ध नसल्यास उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक ०१.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेल्या पदधतीनुसार खरेदी प्रक्रिया करण्यात यावी.

४. याप्रित्यर्थ होणारा खर्च "मागणी क्र. जे-२, २०५२ सचिवालय सर्वसाधारण सेवा, (००) विधी व न्याय विभाग, (००) (०२) ई-गव्हर्नन्स प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी तरतूद (२०५२ ५११६) या लेखाशिर्षाखाली "१७ संगणक खर्च" या उदिष्टांतर्गत खर्च भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३०२१२३८३२३९१२ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Amogh Shyamkant Kaloti

Digitally signed by Amogh Shyamkant Kaloti
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1f733daf00a6028414c43d0cc10d82acab3b732c4edd56e818f8a3b355588753, serialNumber=9ebeebf21dc54ceec51e6d5ffc84bb94ca6af89497279007d66e97dc13547037, cn=Amogh Shyamkant Kaloti
Date: 2019.03.02 12:43:00 +05'30'

(अ. शा. कलोती)
विधि सल्लागार-नि-सह सचिव.

प्रति,

१. महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई,
२. केंद्रीय प्रकल्प समन्वयक, ई-कोर्ट प्रकल्प, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता),-१/ २, मुंबई/नागपूर,
४. महालेखापाल (लेखा परीक्षा)-१/२, मुंबई/नागपूर,
५. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. अतिरिक्त मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,

७. प्रधान सचिव, कौशल्य विकास व उदयोजकता विभाग (अ. का.) मंत्रालय, मुंबई,
८. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
९. प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०. संचालक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१२. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
१३. सह सचिव/कक्ष अधिकारी, २३ व २४, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४. निवड नस्ती,कार्या-७.